महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्चशिक्षण, औरंगाबाद विभाग,
देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड, (नविन इमारत) औरंगाबाद
Web:www.jdheaurangabad.org.in Emailjdheaur_2007@rediffmail.com
फोन नं.- ०२४०-२३३१९१३ फॅक्स नं.- ०२४०-२३३१९१३

जा.क्र.सहसं/उशि/औवि/महाडीबीटी /२०१९/ दिनांक :- २६/०७/२०१९

प्रति,

कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
प्राचार्य,
सर्व शासकीय /अशासकीय,
अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालये
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

विषय :- सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) तसेच खुल्या प्रवर्गातून (EWS) अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिष्यवृत्तीसाठी अनुज्ञेय शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थानी न घेण्या बाबत.

संदर्भः- संचालनालयाचे पत्र क्रं./उशिसं/शिष्य-२०१९/१००२१ दि.२६.०७.२०१९

उपरोक्त विषयी सर्व महाविद्यालयांना व विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या दि.११/७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) तसेच खुल्या प्रवर्गातून (EWS) दि.०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागू आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील / विद्यापीठातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत माहिती देण्यात यावी.तसेच योजनेअंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क अनुज्ञेय आहे,त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेण्यात येवू नये.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमास ५० टक्के शैक्षणिक शुल्क, ५० टक्के परिक्षा शुल्क देय आहे. व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क ५० टक्के भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे.

(डॉ.एस.एम.देशपांडे)
सहसंचालक, उच्चशिक्षण,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

संदर्भ क्र./अभ्यासक्रम वि./२०१९ 1881 - 1331 दिनांक :-३०.०७.२०१९

सदरील पत्राची प्रत सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य आणि मान्यता प्राप्त शिक्षणसंस्थेचे संचालक यांना संदर्भीय पत्राच्या प्रतीसह पाठविण्यात येत असून शासनाच्या निर्देशानूसार विना विलंब कार्यवाही करण्यात यावी.

(सोबत:- वरील प्रमाणे)

उपकुलसचिव
अभ्यासक्रम विभाग

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: school.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/२०१९/ 1002 \ दि.२२.७.२०१९

ई-मेलद्वारे तात्काळ

12 6 JUL 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)

विषयः- सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) तसेच खुल्या प्रवर्गातून (EWS) अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिष्यवृत्तीसाठी अनुज्ञेय शिक्षण शुल्कांची रक्कम शिक्षण संस्थानी न घेण्याबाबत.

संदर्भः- १. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ताशि-४, दि.०७.१०.२०१७

२. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दि.१४.०२.२०१८

३. शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/ताशि-४, दि.१४.०२.२०१८

४.शासन निर्णय क्र.सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक, दि.११ जुलै २०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये, सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) तसेच खुल्या प्रवर्गातून (EWS) दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काचे लाभ देण्यात येतात.

अ) शिक्षण शुल्क :-

| उत्पन्न मर्यादा | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|
| | शासकीय | अशासकीय अनुदानित | टप्पा अनुदानित विना अनुदानित) | कायम विना अनुदानित |
| व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | |
| रु.2.50 लाखापर्यंत | 100 % | 100 % | 50 % | 50 % |
| रु.2.50 लाख ते रु. 8 लाखापर्यंत | 50 % | 50 % | 50 % | 50 % |
| बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | |
| रु. 8 लाखापर्यंत | 100 % | 100 % | 100 % | 100 % |

ब) परीक्षा शुल्क :-

| | |
|---|---|
| व्यावसायिक अभ्यासक्रम | परीक्षा शुल्काच्या 50 % |
| बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | परीक्षा शुल्काच्या 100 % |

तरी आपल्या अधिपत्याखालील अकृषी विद्यापीठे/ महाविद्यालये / संस्था यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच योजनेअंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षणशुल्क अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेऊ नये. तसेच ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शिक्षण शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. अशा सूचना संबंधित विद्यापीठ / महाविद्यालये / संस्थांना देण्यात याव्यात.

(डॉ. विजय नारखेडे)
शिक्षण सहसंचालक,
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत:- १. मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना माहितीस्तव सादर
२. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई. यांना माहितीस्तव सादर
३. मा.संचालक, वि.जा,भ.ज,व इमाव,विमाप्र, संचालनालय, पुणे-१ यांना माहितीस्तव.
४.कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे. यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.